**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अजित रावसाहेब भोईटे
मु.पो.तडवळे, सं.वाघोली, ता.कोरेगाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
माध्यमिक शिक्षण विभाग, सातारा जिल्हा परिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
सौ वत्सला भोईटे माध्यमिक विद्यालय, तडवले, ता.कोरेगाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७९ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
माध्यमिक शिक्षण विभाग, सातारा जिल्हा परिषद, सातारा श्री.उदयसिंह भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सौ वत्सला भोईटे माध्यमिक विद्यालय,
तडवले, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.दिपक चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. - |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.७.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००६-२००७ पटावरील विद्यार्थ्यांची यादी, कर्मचारी नेमणुकीच्या जाहिरातीची प्रत, मस्टर प्रत, शाळेच्या नावावर असलेल्या मालमत्तेची कायदेशीर कागदपत्राची प्रत, शाळेतील साहित्य खरेदीच्या पावत्या, मूल्यांकन अहवाल (वेळोवेळी सादर केलेले) व शासनाचे आदेश |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अजित रावसाहेब भोईटे यांनी सौ वत्सला भोइटे माध्यमिक विद्यालय, तळवडे, या शाळेतील सन २००० ते २००६-०७ या काळातील विद्यार्थी, कर्मचारी, मालमत्ता आदिबाबतची माहिती मागितली होती. ती न मिळाल्यामुळे श्री.भोईटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), माध्यमिक शिक्षण विभाग, सातारा यांच्याकडे अपील केले. झेरॉक्सचा खर्च घेऊन १५ दिवसात माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी श्री.उदयसिंह भोसले यांनी दिला. ऊर्वरित माहिती देण्याचे दि.२३.१०.२००८रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त प्रपत्रात नमूद केल्यानंतरही विलंबाने दिली. त्यामुळे त्यांना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.भोईटे यांनी निवेदनाद्वारे केली.

यातील बहुसंख्य माहिती शाळेतील नसून संस्थेकडील होती. त्यामुळे संस्थेकडून माहिती येईपर्यंत आपण देऊ शकलो नाही असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री.दिपक चव्हाण यांनी केले. दि.२३.१०.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त नमूद केल्यानुसार आपण श्री.भोसले यांना शुल्क कळविले. त्यांनी शुल्क भरल्यानंतर माहिती दिली, असेही श्री.दिपक चव्हाण यांनी नमूद केले. मूळ अर्जानंतर सहा महिन्यांनी माहिती देतानाही आपल्याकडून रुपये ५००/- शुल्क घेतले गेले, हे नियमबाह्य आहे, असे प्रतिपादन श्री.भोसले यांनी केले. आपल्याला कायद्याच्या प्रक्रियेबाबत पूर्ण माहिती नसल्यामुळे अनवधानाने शुल्क कळविले. अपीलकर्त्याने शुल्काची रक्कम आमच्याकडेच दिली व आम्हीच ती चलनाने भरली. शुल्क घेण्यात चूक झाली, त्यामुळे एकदा माफी करावी यापुढे अशा प्रकारची चूक व विलंब

होणार नाही, अशी विनंती श्री.चव्हाण यांनी लेखी व तोंडी केली. संबंधित शुल्काची रक्कम रु.५००/- अपीलकर्त्याला परत करण्याच्या आयोगाच्या आदेशानुसार अपीलकर्त्याला परत करीत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याला शुल्काची रक्कम रु.५००/- परत करुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सौ.वत्सला भोईटे माध्यमिक विद्यालय, तडवळे, ता.कोरेगाव श्री.दिपक चव्हाण यांनी पोहोच आयोगाला सादर करावी.

(३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सौ वत्सला भोईटे माध्यमिक विद्यालय, तडवळे, ता.कोरेगाव श्री.दिपक चव्हाण यांची माफीची विनंती मान्य करण्यात येत असून यापुढे माहिती देण्यात विलंब, कुचराई होऊ नये याची समज त्यांना देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २.३.२००९

१४-१६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सचिन चंद्रकांत नाईकनवरे
कच्छी निवास, लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
जिल्हा आरोग्य केंद्र, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणंद, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८१ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सचिन चंद्रकांत नाईकनवरे
कच्छी निवास, लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
जिल्हा आरोग्य केंद्र, सातारा प्रतिनिधी डॉ.एस.डी.निकम

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्य अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणंद, जि.सातारा डॉ.सतिशकुमार यशवंत सरोदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००० ते २००६ या कालावधीत प्राथमिक आरोग्य केंद्रातून लोणंद ग्रामपंचायत यांना फिनेलचा (स्वच्छतेसाठी वापरण्यात येणारा द्रव) वितरीत केलेला पुरवठा. | |

## विवेचन

प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणंद यांनी सन २००० ते २००६ या काळात ग्रामपंचायत लोणंद यांना केलेल्या फिनेल पुरवठ्याबाबत तपशीलवार माहिती अपीलकर्ता श्री.सचिन चंद्रकांत नाईकनवरे यांनी मागितली होती. विलंब झालेला असताना शुल्क भरुन घेतले व खोटी माहिती दिली, या कारणावरुन श्री.नाईकनवरे यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे अपील केले. परंतु गटविकास अधिकारी हे अपिलीय प्राधिकारी असल्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून श्री.नाईकनवरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश दि. २३.१०.२००८ रोजी करण्यात आला होता. तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

श्री.नाईकनवरे यांना शुल्क भरण्याबाबत तोंडी निरोप दिला होता. परंतु ते न आल्यामुळे पत्र पाठविले. शुल्क भरल्यानंतर माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणंद, जि.सातारा यांनी सांगितले. आपण अपिलीय प्राधिकारी नसून गटविकास अधिकाऱ्यांकडे अपील करणे आवश्यक आहे हे कळविणे आपल्याकडून नजरचुकीने राहून गेले असे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. लोणंद ग्रामपंचायतीला प्रत्येकी ५ लिटरचे ५० कॅन

देण्यात आल्याची माहिती जन माहिती अधिकारी डॉ.सतिशकुमार सरोदे यांनी दिली. परंतु लोणंद ग्रामपंचायतीने फक्त २८ कॅन मिळाल्याचे लेखी दिले, त्यामुळे लोणंद प्राथमिक आरोग्य केंद्राकडून २२ कॅन (११० लिटर) फिनेलचा भ्रष्टाचार झाला असे श्री.नाईकनवरे यांचा आरोप आहे. ५० कॅन वितरित केल्याचे मूळ कागदपत्रात नमूद केले होते, परंतु त्यातील २८ कॅन लोणंद ग्रामपंचायतीमार्फत व उरलेले २२ कॅन ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या काळात निर्जंतुकीकरणासाठी वापरण्यात आले. तसे दि.२६.२.२००८ रोजी संबंधितांना कळविले, लेखी खुलासा केला, असे जन माहिती अधिकारी डॉ.सतिशकुमार सरोदे व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी डॉ.एस.डी.निकम यांनी नमूद केले. या खुलाशाची प्रत त्यांनी सादर केली. अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या माहितीचे स्पष्टीकरण या खुलाशात असल्यामुळे त्याच्या प्रती त्याचवेळी अपीलकर्त्यास दणे योग्य ठरले असते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) फिनेलच्या वितरण / वापराबाबत संबंधितांनी केलेल्या खुलाशाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्वरित द्याव्यात.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश मनोहर वाघमारे
रा.अंबाबाई मंदिराजवळ, लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
वाई उपविभाग, वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४८२ / सातारा / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश मनोहर वाघमारे
रा.अंबाबाई मंदिराजवळ, लोणंद, ता.खंडाळा, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा प्रतिनिधी श्री.एस.एम.शेटे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
वाई उपविभाग, वाई, जि.सातारा श्री.दीपक ब.नलवडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.३१.३.२००१ चे पत्रावर केलेल्या कार्यवाहीची तपशिलात्मक लेखी माहिती, दि.१४.८.२००६ च्या तक्रारी अर्जावर केलेल्या कार्यवाहीची जाबजबाबासह तपशिलात्मक माहिती, दस्त नोंदणीस व ७/१२ नोंदणीस लागणाऱ्या कालावधीची माहिती, शासन निर्णयाच्या छायांकित प्रती व कार्यवाहीची स्पष्टीकरणात्मक माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रमेश मनोहर वाघमारे यांनी मागणी केलेल्या माहितीचा नेमकेपणा स्पष्ट होत नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, जि.सातारा यांनी माहिती दिली नाही. हा मुद्दा ग्राह्य धरुन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी अपीलकर्त्यास नेमक्या माहितीच्या मागणीचा अर्ज देण्याची सूचना देऊन अपील निकाली काढले. परंतु आपल्याला माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन श्री.वाघमारे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

दि.१८.१.२००८ रोजी श्री.वाघमारे यांना कागदपत्रे देण्यात आल्याचे व कायद्यामधील तरतुदीबाबतची माहिती कायद्याच्या पुस्तकातून घ्यावी, असे कळविल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. मात्र आपल्याला अपेक्षित माहिती न देऊन दिशाभूल

करण्याचा प्रयत्न केला आहे, असे प्रतिपादन श्री.वाघमारे यांनी केले. जन माहिती अधिकाऱ्यांना दंड करुन दंडाची रक्कम आपल्याला मिळावी अशी मागणी श्री.वाघमारे यांनी अपिलात केली असून त्यावरुन अपीलकर्त्यांचा हेतू स्वच्छ नसल्याचे स्पष्ट होते, असे जन माहिती अधिकारी श्री.दीपक नलवडे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा मधील प्रपत्रात, तसेच दि.२२.१०.२००८ व दि.१७.२.२००९ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

सन १९८९ मध्ये आपल्या चुलतीचे निधन झाले, परंतु जमिनीच्या नोंदीमध्ये २००२ मध्ये फेरफार झाला. त्याबाबत आपण तक्रार केली असून त्यावरील कार्यवाहीची जाबजबाबासह प्रतींची माहिती आपल्याला मिळाली नाही, असे श्री.वाघमारे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. श्री.वाघमारे यांनी या संदर्भात विविध अर्ज केले असून तक्रार अर्जावरील कार्यवाही व जाबजबाबाच्या प्रती ही माहिती नि:शुल्क दिली. भू-संपादन कायद्यानुसार द्यावयाच्या नुकसानभरपाईची नोटीस देऊन त्यानुसार योग्य त्या व्यक्तींना रक्कम देण्यात आली आहे. दस्त नोंदणी व ७/१२ नोंदणी याबाबतच्या कायद्यातील तरतुदीबाबतची माहिती कायद्याच्या पुस्तकातून घ्यावी, असे कळविले, असे श्री.दीपक नलवडे यांनी सांगितले.

वस्तुत: कायद्याची पुस्तके उपलब्ध असून त्यातील तरतुदींचा तपशील माहिती म्हणून मागणे योग्य नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

दस्त नोंदणीबाबतची माहिती आपल्याकडे नसून उपनिबंधक कार्यालयाकडे मिळेल, असे कळविण्याऐवजी जन माहिती अधिकाऱ्यांनी मूळ अर्ज एकतर उपनिबंधक कार्यालयाकडे पाठवावयास हवा होता किंवा त्याबाबत संबंधित कायद्याचे पुस्तक कोणते आहे याची माहिती द्यावयास हवी होती.

अपीलकर्त्यांच्या सर्व मुद्यांवर जन माहिती अधिकारी श्री.दीपक नलवडे यांनी तपशीलवार उत्तर वेळोवेळी दिले असून अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनीही त्याची योग्य नोंद घेतली आहे. मात्र सर्वसामान्य नागरिकाला मदत करण्याचा एक भाग म्हणून कायद्याच्या

लागूपुरत्या तरतुदींची छायांकित प्रत अपीलकर्त्यास तीन दिवसात द्यावी, असा तोंडी आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य मुदतीत अर्जाची व प्रथम अपिलाची दखल घेतली असल्यामुळे शास्तीची अपीलकर्त्यांची मागणी अमान्य करण्यात येत आहे. शास्ती लागू करुन ती रक्कम आपल्याला मिळावी, ही अपीलकर्त्यांची मागणी निरर्थक व त्याच्या हेतूविषयी साशंकता निर्माण करणारी आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य.

(२) कायद्याच्या पुस्तकातील लागूपुरत्या तरतुदींची छायांकित प्रत देण्याच्या आदेशाचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई, जि.सातारा यांनी आयोगाला दि.१५.३.२००९ पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.५.३.२००९**

४३-४६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ. सौ. निर्मला जयवंत पाटील
२०१, गगनगड.आयआयटी बॉम्बे स्टाफ — अपीलकर्ता
को.ऑप हौ. सोसायटी लि., पवई, मुंबई-७६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५११ / कोल्हापूर /२००८ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.४.२००७ |
| ३ | उपस्थित<br>**अपीलकर्ता** : डॉ. सौ. निर्मला जयवंत पाटील<br>२०१, गगनगड.आयआयटी बॉम्बे स्टाफ<br>को.ऑप हो. सोसायटी लि., पवई, मुंबई-७६<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक,<br>राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर, जि. कोल्हापूर<br>श्री. व्ही. एस. तडकोड | |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.७.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.९.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ७ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>श्री. अजितसिंग दत्ताजीराव घाटगे यांची आर्थिक परिस्थिती नसताना त्यांना सीएल-३ अनुज्ञप्ती कशी मंजूर झाली त्याबाबतच्या कागदपत्रांच्या, तसेच आयकर विभागाच्या नाहरकत दाखल्याच्या छायांकित प्रती | |

## विवेचन

आपले बंधू श्री. अजितसिंग दत्ताजीराव घाटगे यांचे उत्पन्न दरमहा २००/- रूपये असून आर्थिक परिस्थिती चांगली नसताना त्याना दारु दुकानाचा परवाना कसा दिला, याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रतीसह माहिती मागणारे अर्ज व अपिले अपीलकर्त्या डॉ.सौ. निर्मला जयवंत पाटील यांनी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांच्याकडे केली होती. अपिले वेगळी असली तरी एकाच कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, यांनी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर या कार्यालयाकडे डॉ. सौ.पाटील यांचा अर्ज पाठविला. आपल्याला माहिती दिली गेली नाही, व आपण केलेल्या अपिलाचा निर्णयही जन माहिती अधिकारी यांनीच दिला, असे नमूद करून डॉ.सौ.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्त्या गैरहजर होत्या, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

डॉ.सौ.पाटील यांच्या अर्जाची छायांकित प्रत फिकट असल्यामुळे वाचता येत नव्हती, त्यामुळे जेवढा मजकूर वाचता आला तेवढी माहिती त्यांना देण्यात आली होती. प्रथम अपिलात नेमकी मागणी केल्यानंतर उर्वरित माहिती देण्यात आली. मात्र सीएल-३/एफएल-२ अनुज्ञप्ती मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव शासनाला सादर केले जातात व शासन त्यावर निर्णय घेते. श्री. घाटगे यांनी सन १९७३ मध्ये दिलेल्या सीएल-३ अनुज्ञप्तीची प्रत आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे देता आलेली नाही. त्याव्यतिरिक्तची सर्व कागदपत्रे देण्यात आली आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांनी सांगितले.

डॉ.सौ.पाटील व श्री. अजितसिंह दत्ताजीराव घाटगे यांच्यामधील कौटुंबिक वादातून अनेक अर्ज, तक्रारी व न्यायालयीन दावे केले जात असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. याच अनुषंगाने अपील क्र. ५११, ५१२, ५१३ व ५१४ / कोल्हापूर ही अपिलेही राज्य माहिती आयोगाकडे दाखल आहेत. यात सार्वजनिक हिताचा कोणताही विषय नाही, हे अपीलकर्त्यांनी लक्षात

घेणे आवश्यक आहे. मात्र विषय व्यक्तिगत स्वरूपाचा असला तरी शासकीय कागदपत्रे नागरिकांना उपलब्ध झाली पाहिजेत, याची नोंद शासकीय यंत्रणेने घेणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. शासनाने दिलेल्या अनुज्ञप्तीची प्रत शासनाकडून मिळवून जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. त्याबाबतचा पूर्तता अहवाल संबंधीत मुदतीनंतर आयोगाकडे सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

डॉ. सौ. निर्मला जयवंत पाटील
२०१, गगनगड.आयआयटी बॉम्बे स्टाफ — अपीलकर्ता
को.ऑप हौ. सोसायटी लि., पवई, मुंबई-७६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार, कागल, ता.कागल — उत्तरवादी
जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
निवासी नायब तहसीलदार, कागल, ता.कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१२ / कोल्हापूर /२००८ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.४.२००७ |
| ३ | उपस्थित<br>अपीलकर्त्या : डॉ. सौ. निर्मला जयवंत पाटील<br>२०१, गगनगड,आयआयटी बॉम्बे स्टाफ<br>को.ऑप हौ. सोसायटी लि., पवई, मुंबई-७६<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कागल, ता.कागल, जि. कोल्हापूर<br>श्री. सुरेश मुळे<br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कागल,<br>ता.कागल, जि. कोल्हापूर<br>श्री. एस.एम.शिंदे | |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.७.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.९.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे पिंपळगाव खुर्द, ता. कागल, जि. कोल्हापूर येथील गट नं. ६४४ चा ७/१२ व फेरफार उतारा, तसेच अपीलकर्त्या डॉ.सौ. पाटील यांच्या वडिलोपार्जित जागेतील कुळाच्या नावात झालेला बदल व त्या संदर्भातील उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती, उप विभागीय अधिकारी, कागल व कुळकायदा अव्वल कारकून, कागल यांच्याकडे झालेल्या ठरावाच्या सही शिक्क्याच्या नकला |

## विवेचन

मौजे पिंपळगाव खुर्द, ता. कागल, जि.कोल्हापूर येथील वडिलोपार्जित जागेतील कुळाच्या नावातील बदल व त्या संदर्भातील न्यायालयात दाखल केलेल्या कागदपत्रांची व इतर अनुषंगिक माहितीची मागणी अपीलकर्त्या डॉ. सौ. निर्मला जयंत पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल, जि. कोल्हापूर यांच्याकडे केली होती. आधी माहिती दिली नाही. नंतर अपुरी व चुकीची माहिती दिली, कागदपत्रांच्या सत्यप्रती करून दिल्या नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी पक्षपातीपणे माहिती दडविण्याला हातभार लावला, इत्यादी कारणांवरून डॉ.सौ.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्त्या गैरहजर होत्या, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

संबंधित जमीन आपल्यासह बारा मालकांच्या नावे असून त्यातील वहिवाटदारांच्या नावात बेकायदेशीररीत्या बदल केला. हा बदल कोणत्या कागदपत्रांच्या आधारे केला गेला याची माहिती आपल्याला दिली जात नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कागल श्री. वाय.एस.कांबळे, पिंपळगाव खुर्दच्या महिला तलाठी, मंडल अधिकारी श्री. एस.एम.शिंदे, आदींनी संगनमताने हा बेकायदेशीर बदल केला आहे. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री. सुरेश मुळे यांनी आपल्या अपिलाची सुनावणी दि. ९.८.२००७ रोजी ठेवल्याचे पत्र दि.४.८.२००७ रोजी पाठविले. मुंबईहून सुनावणीसाठी जाण्यासाठी पुरेशा मुदतीने ते पाठविलेले नव्हते. आपल्याला उपस्थित राहता येऊ नये, म्हणून जाणीवपूर्वक अशा प्रकारे सुनावणी ठेवली गेली. त्यानंतर आपण कागलला

जाऊन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, श्री. सुरेश मुळे यांना भेटल्यावर आपल्याला त्यांच्या सूचनेनुसार कागदपत्रे दाखविण्यात आली. मात्र त्याच्या प्रती पाठविण्याचे कबूल करूनही तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. वाय.एस.कांबळे यांनी त्या न पाठविता वेगळीच कागदपत्रे पाठविली. आपण श्री. सुरेश मुळे यांना दि. २०.९.२००७ रोजी भेटलो, त्यावेळी अपिलाच्या निर्णयाबाबत ते काहीही बोलले नव्हते. मात्र आपण मुंबईला परतल्यानंतर दि. १७.९.२००७ ही तारीख हस्ताक्षरात नमूद केलेले त्यांचे निकालपत्र आपल्याला पाठविण्यात आले. याचा अर्थ मागील तारीख टाकून निकालपत्र तयार करण्यात आले, असे स्पष्ट होते. लिपिकाने पाठविलेल्या छायांकित प्रतीत कागदपत्रांवर तारखा नमूद नाहीत, त्या प्रमाणित केलेल्या नाहीत, असे प्रतिपादन डॉ.सौ.पाटील यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार हे निवृत्त झाले आहेत. उपलब्ध कागदपत्रे सौ.पाटील यांना देण्यात आली आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी निवासी नायब तहसीलदार श्री. एस.एम.शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री. सुरेश मुळे यांनी केले.

काही कागदपत्रांच्या छायांकित प्रतीवरून प्रती देण्यात आल्या आहेत. मात्र छायांकित प्रतीवरून सत्यप्रती देणे नियमात नसल्याने देता येणार नाही. तसेच मूळ अर्जात मागितलेली सर्व कागदपत्रे देण्यात आली आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री. एस.एम.शिंदे व अपिलीय प्राधिकारी श्री. सुरेश मुळे यांनी नमूद केले. मात्र अशा प्रती अधिकृत मानल्या जात नसल्याने आपल्याला त्या न्यायालयात सादर करता येणार नाहीत, असे प्रतिपादन डॉ.सौ.पाटील यांनी केले. संबंधित कागदपत्रांवरील तारखा दिसत नसल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.

कुळाच्या नावातील बदलाचा कायदेशीरपणा हा डॉ.सौ.पाटील यांच्या अपिलाचा मुख्य विषय आहे. माहितीच्या अधिकारात त्याचा निर्णय येत नाही. या बदलाच्या संदर्भातील मंडल अधिकारी श्री. शिंदे यांचा अहवाल व अनुषंगिक कागदपत्रांच्या सर्व प्रती मात्र त्यांना दिल्या जाणे आवश्यक आहे. यातील काही कागदपत्रे त्यांना देण्यात आल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाबाबत डॉ.सौ.पाटील यांनी नोंदविलेल्या मुद्दयांसदर्भात अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री. सुरेश मुळे समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. अपिलाच्या हाताळणीबाबत नि:संदिग्धता व पारदर्शकता ठेवण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. प्रत्येक कागदपत्रांच्या तारखेसह नोंद असलेले त्याचा अधिकृतपणा नमूद करणारे पत्र अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांनी अपीलकर्त्या डॉ.सौ. निर्मला जयवंत पाटील यांना आठ दिवसात द्याव्यात. त्यानुसार केलेल्या पूर्ततेचा अहवाल आयोगास सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.३.२००९